**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

# प्रेसनोट दिनांक - २५/०८/२०२२

**दि.२४/०८/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | आळंदी २५७/२०२२ भादवि कलम ३९५,४५२,३२३,५०४,५०६प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक १७/८/२०२२ २२/०० वा चे सुमारास मौजे चिंबळी येथील महादेव कॉम्पलेक्स समोर ,दत्ता इंजिनिअरींग वर्क या बिल्डींग मधील गाळा न.३ येथे फ्रेंड्स मेन्स पार्लर या दुकानात |
| गुन्हा दाखल | :- | दि २४/०८/२२ रोंजी २०.०९ वा |
| फिर्यादी | :- | नदीम अकबरअली शहा वय ३२ वर्शे व्यवसायः-सलून दुकान चालविणे सध्या रा.ज्योतिबा नगर ,सहकार कॉलनी ,जाधव कॉम्पलेक्स काळेवाडी पुणे मुळ गाव रा.शहपूरा ता तांडा जि रामपूर राज्य ,उत्तरप्रदेश |
| आरोपी | :- | १)संभाजी शेलार (पुर्ण नाव ,पत्ता माहिती नाही ) व इतर ७ ते ८ अनोळखी इसम<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद वेळी तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादी यांचे नातेवाईक नामे फाजिल शहा असे दोघेजण चिंबळी येथील महादेव कॉम्पलेक्स समोर ,दत्ता इंजिनिअरींग वर्क या बिल्डींग मधील गाळा न.३ येथे फ्रेंड्स मेन्स पार्लर या दुकानात काम करीत असताना त्यावेळी यातील आरोपी क्रं १ व त्याचे सोबत इतर ७ ते ८ अनोळखी इसम फिर्यादी यांचे दुकानात येवून फिर्यादीस अर्वाच्च भाषेत शिवीगाळ व दमदाटी करून म्हणू लागले की मादरचोद तेरे को बोला ना दुकान नही चालू करनेका फिर भी तुमने दुकान चालू किया असे म्हणून आरोपी मजकुर यांनी फिर्यादीस हाताने डोक्यात,पाठीवर ,पोटावर ,पायावर मारहाण करून जखमी करून फिर्यादीचे दुकानातील बॅग मधील एकूण ८५००/रूपये जबरदस्तीने चोरी करून घेवून गेले आहे.म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि पाटील सो मो न९८५०५७६७८९ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ३८५/२०२२, भा.दं.वि. कलम ३८५,३४१,५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/०८/२०२२ रोजी १४/४५ वा.च्या सुमारास बिजलीनगर पुलाचे थोडे पुढे वाल्हेकरवाडी रोडवर चिंचवड पुणे येथे तसेच पवना नदीचे जवळील चौकाजवळ चिंचवड पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२४/०८/२०२२ रोजी २०/ ३२ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)संदिप बाळकृष्ण वळसे वय ४० वर्ष तसेच २)सासु महिला आरोपी वय ६० वर्ष दोघे रा. मु..जवळे. पो.निरगुडसर. ता.आंबेगाव.जि.पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | यातील आरोपीत क्र १ हा फिर्यादी यांचा दिर असुन आरोपीत क्र २ ही सासु आहे. फिर्यादी यांचे पतीचे निधन झाले असुन त्यांचे नावावर असलेली सर्व प्रॉपर्टी व पैसे हे फिर्यादीचे नावावर झालेली आहे. त्याचा राग मनात धरुन वरील दोन्ही आरोपीत हे फिर्यादीस वारंवार सदरची प्रॉपटी व पैसे त्यांचे नावावर करण्यास सांगुन पैसे देण्यासाठी दबाव आणतात. वर नमुद केले तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या त्यांचे मोटार सायकल वरुन घरी येत असताना यातील आरोपी क्रं १ याने त्याचे दुचाकी फिर्यादीचे गाडीस आडवी लावुन तुझ्या पतीचे तुला मिळालेले पैसे मला दे. तसेच जमिनीचे व फ्लॅटचे हक्क सोडुन दे, नाहीतर याचे खुप वाईट परिणाम होतील. तु जर मला पैसे तसेच हक्क सोड दिला नाहीस, तर तुला मी सोडणार नाही व पोलीस कोर्टकचेरीच्या फेरी |

मारायला लावीन असे धमकावले. त्याला काहीच न बोलता फिर्यादी त्यांच्या घराकडे निघाले. तरीही आरोपी क्रं १ हा फिर्यादी यांचा पाठलाग करत बिर्ला हॉस्पिटल जवळील पवनानदीच्या पलीकडील चिंचवड गावाजवळील चौकापर्यंत फिर्यादीचे मागे येऊन, त्याची गाडी आडवी लावुन, पुन्हा पुन्हा फिर्यादीकडे पैसे व जमीन तसेच फ्लॅटचा ताबा जबरदस्तीने मागुन जीवे मारण्याची धमकी दिली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- नवनाथ कुदळे, पोलीस उपनिरीक्षक ७०५८३२२३२३

३.

पोस्टे व गु रजि.नं. :- निगडी६२३/२०२२भा.द.वी.कलम ३७६,५०६ मा. तं. अधि.कलम ६६ (ई).

गु.घ.ता.वेळ व ठि. :- ०९/०५/२०२१ पासुन ते आज दिनांक २३/०८/२०२२ रोजी २३.४० वाजे पर्यत.रुपीनगर येथील लॉजवर व वेगवेगळया ठिकाणच्या लॉजवर व यातील फिर्यादी राहत होते त्या ठिकाणचे रुमवर.

गुन्हा दाखल :- दि.२४/०८/२०२२ रोजी ०२/१७ वा

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- गणेश रोहिदास गोरे वय २४ वर्षे व्यवसाय – नोकरी रा. परळीवैजनाथ, कन्डक्टर कॉलनी जि.बीड मो.नं.८७९९८६७०३७.९४०५७११३४३. **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी यांची इंस्टाग्राम या ॲपवरुन ओळख झाली होती आरोपी याने रुपीनगर येथील लॉजवर व वेगवेगळया ठिकाणी व यातील फिर्यादी राहत होते त्या ठिकाणचे रुमवर.फिर्यादी यांना लग्नाचे अमिष दाखवुन फिर्यादी सोबत वारंवार शारिरीक संबंध ठेवुन फिर्यादी बरोबर मोबाईल फोनवर व ईन्स्टाग्रामवर व वॉटसॲपवर संभाषण करुन बदनामी करतो.असे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि ताकतोडे

४.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ३७८ /२०२२ भा.द.वी कलम ३५४,३५४(ड), .३२४,३२३,१७०,५०४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२३/०८/२०२२ रोजी २२.२० ते २२.३० वा.चे दरम्यान नेताजीनगर गल्ली नंबर-१, काटेपुरम चौक,पिंपळे गुरव,पुणे येथील रोडवर व फिर्यादीचे घराचे पहिल्या मजल्यावरील जिन्याच्या पाय-यावर.

गुन्हा दाखल :- दि.२४/०८/२०२२ रोजी ०४/२७ वाजता

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- प्रसन्न राजेंद्र टेळे वय २७ वर्षे धंदा-नोकरी, सध्यारा.गाडवेकॉलनी,शास्त्रीनगर,कोथरुड,पुणे ,मुळ गाव रा.बसवनगर, मंद्रुक,ता.दक्षिण सोलापुर, **,आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादी यांचा वाईट भावनेने पाठलाग करुन फिर्यादी हया घराचे पहिल्या मजल्यावर जिन्याने पाय-या चढत असताना फिर्यादी यांच्या पाठीमागुन येवुन काही एक कारण नसताना फिर्यादी यांना शिवीगाळ करुन फिर्यादी यांचा उजवा हात पकडुन फिर्यादी यांच्या शरिराला स्पर्श करुन फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न करुन फिर्यादी यांनी आरडा ओरडा केल्यानंतर त्याठिकाणी आलेल्या फिर्यादी यांचा भाऊ महेश आप्पासाहेब झांबरे वय ३० वर्षे यास शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन उजव्या हाताला चावा घेवुन तो पोलीस असल्याची खोटी बतावणी करुन तोतयागिरी केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि खलाटे ९५५२५३३५११

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ७२६ /२०२२, भादवी कलम ३५४(अ)(ड), ५०९, ५००, ५०४, ५०६, ३४. सह कलम ६७ (ब) आय.टी. ॲक्ट. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. २७/०९/२०२१ रोजी पासुन ते दिनांक १४/०७/२०२२ पर्यंत.हरीतशिल्प सोसायटी, फ्लॅट नं. ए/१-१०५, १ ला मजला, रहाटणी, गोडांबे चौकाजवळ, पिं.चिं. पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२४/०८/२०२२ रोजी १७/४० |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) अमर मनबहादुर थापा, व २) महिला आरोपी, दोघे रा. जेएपी १, दोरांडा, रांची, झारखंड, ८३४००२. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ याने स्टारमेकर ॲपवर फिर्यादी यांचेशी मैत्री करुन, फिर्यादीस प्रपोज केले असता, फिर्यादीने नकार दिल्याचे कारणांवरुन, आरोपी याने त्या ॲपवरुन, मोबाईल व व्हाटसॲप वरुन मेसेज करुन फिर्यादीस अश्लिल शब्द वापरले. तसेच स्टारमेकर ॲपवरुन फिर्यादीचे फोटोचा गैरवापर करुन, त्याखाली त्यांचे मनास लज्जा निर्माण करणारे मेसेज प्रसारीत केले. त्यामुळे फिर्यादी यांना इतर लोकांनी फोन करुन त्रास दिला व बदनामी केली. सदरची गोष्ट आरोपी क्रं १ याचे पत्नीस आरोपी क्रं २ हिस सांगितली असता, तिनेही फिर्यादी यांना शिवीगाळी करुन दोघांनीही आणखी बदनामी करण्याची व मारण्याची धमकी दिली. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि. एस. एस. जाधव,९७६२२२०४२४ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ५१७/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम.कलम. ७ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१२/०८/२०२२ रोजी १५.०० ते दि.१७/०८/२०२२ रोजी २३.४५ वा दरम्यान महावितरण भोसरी उपविभाग कार्यालय, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२४/०८/२०२२ रोजी १९/१० वा. |
| फिर्यादी | :- | श्री.कल्लुवीतील मथाई जॉनी, वय ७९ वर्षे, धंदा - कंपनी चालक, पत्ता फ्लॅट नं.१५, २२७/२, मारुती कॉम्प्लेक्स, पिंपरी कॉलनी, पुणे |
| आरोपी | :- | श्री.संतोषकुमार बाळासाहेब गित्ते, कनिष्ठ अभियंता, महावितरण उपविभाग भोसरी, पुणे रा. अनंत तरंग सोसायटी, फॅलट क्र.३०१, सी- विंग, सिध्दी विनायक वडापाव सेंटर समोर, चऱ्होली फाटा, चऱ्होली पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची रिनी इंजिनिअर्स नावाची कंपनी जे - ३१८, एमआयडीसी भोसरी, पुणे या ठिकाणी असुन तिथे त्यांची एकुण १५ गुंठे जागा आहे. सदर कंपनीतील लाईट मिटर कनेक्शन तोडण्यासाठी आलेले श्री.संतोषकुमार बाळासाहेब गिते कनिष्ठ अभियंता, महावितरण भोसरी उपविभाग, पुणे यांनी फिर्यादी यांच्याकडे रु.५०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन त्यांनी त्यांच्या पदाच्या नात्याने आवश्यक काम पार पाडण्यासंबंधात कायदेशीर परिश्रमका खेरीज अन्य पारितोषण म्हणून भ्रष्ट, बेकायदेशीर मार्गाने, आपल्या पदाचा गैरवापर करून लाच रक्कम स्वत:साठी मागणी करुन फायदा मिळविणेच्या उददेशाने गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोलीस निरिक्षक माने ला.लु.प्र.अधि. ८४८५००५०२० |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ४४१/२०२२ भा.दं.वि. कलम ३६३ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२३/०८/२०२२ रोजी १४/०० वाजताचे सुमा नंदनवन हौसीग सोसायटी, बिल्डीग नंबर ए-२,प्लॅट नंबर ३०४, घरकुल चिखली पुणे |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि.२४/०८/२०२२ रोजी ०२/२१ वाजता. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मुलगी,वय १७ वर्षे ही तिचे मैत्रिणीस घराबाहेर सोडुन येते असे सांगुन घराबाहेर गेली असता ती परत घरी नाही तिस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन फुस लावुन पळवुन नेले आहे म्हणुन गुन्हा नोंद |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि बारवकर ९८२३३५५०६० |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १३४७/२०२२ भादवी कलम ३६५,३२३,५०४,५०६,३४,आर्म ॲक्ट ४(२५) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२३/०८/२०२२ रोजी १९/१५ वा.ते दि २३/०८/२०२२ रोजी २१/३० वा चे दरम्यान चाकण वाईन्स शेजारील हिल टॉप हॉटेल समोर चाकण ता खेड जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. २४/८/२०२२ रोजी १८/०४ वा |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी |
| आरोपी | :- | १) सागर महादेव सावंत वय २७ वर्ष, रा. नाणेकरवाडी,ता.खेड,जि.पुणे.मुळ रा. कुरूची ता.इंदापूर जि.पुणे. २)अर्जुन खेडेकर,पुर्ण नाव माहित नाही पत्ता माहित नाही ३)मयुर पुर्ण नाव माहित नाही पत्ता माहित नाही ४)त्याचे इतर मित्र नाव पत्ता माहित नाही **आरोपी क्रं १ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी ठिकाणी यातील फिर्यादी हे चाकण वाईन्स शेजारील हिल टॉप हॉटेलमध्ये बसलेले असताना आरोपी १ याने योगेश शिंदेला त्यांचेतील दुपारच्या पैश्यावरुन झालेला वाद मिटवण्याकरीता हॉटेलच्या बाहेर समोरील रस्त्यावर बोलावुन सोबत आरोपी २ व ३ व त्यांचे इतर मित्र इरटीगा व सिल्व्हर रंगाची गाडी घेवुन आल्यानंतर योगेशला पैश्याच्या कारणावरुन शिवीगाळ करत हाताने व काठीने मारहाण केली व त्याला जबरदस्तीने जीवे मारण्याची धमकी देवुन त्याचेकडील इरटीगा गाडी मध्ये टाकुन घेवुन जावुन रात्री साधारण ०९/३० वा.चे सुमारास आरोपी २ याने योगेशच्या फोनवरुन बाजीराव नागरगोजे याला व्हिडीओ कॉल करुन योगेशला लाथा बुक्यांनी, काठ्यांनी मारहाण करत असल्याचे दाखवले व आमच्याशी वाद घातल्यावर आम्ही असाच माज मोडतो अशी धमकी दिली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ७६२०६६०९०१ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव परंदवडी४२ /२०२२, भा.द.वी.कलम ४२०, २८५, २८६ सह अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ सह स्फोटक पदार्थ कायदा १८८४ चे कलम ९(ब)(२) व महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) व ८३ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२३/०८/२०२२ रोजी १९/०० वा दरम्यान मौजे उर्से गावचे हद्दीत पद्मावती किराणा दुकानात |
| गुन्हा दाखल | :- | दि. २४/०८/२०२२ रोजी ०३.४० वा. |
| फिर्यादी | :- | समाधान लक्ष्मण फडतरे, पो. शि. बक्कल नं. २२४१, नेमणुक- शिरगांव परंदवडी पोलीस चौकी, पिंपरी चिंचवड आयुक्तालय |
| आरोपी | :- | १) योगेश बाळु ठाकूर, वय ३२ वर्षे रा उर्से ता मावळ जि पुणे २)सौ. अरुणा योगेश ठाकुर, वय ३२ वर्षे, रा.उर्से,ता.मावळ, जि.पुणे ३)सुनिल तुकाराम सावंत वय २३ वर्षे रा.योगेश ठाकुर यांचे खोलीत भाडयाने उर्से |

| | | |
|---|---|---|
| | | ता.मावळ जि.पुणे **आरोपी क्र.१ व ३ अटक आहेत** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर यांनी संगणमताने जिवनावश्यक वस्तू असलेल्या घरगुती वापराचा गॅस विनापरवाना मोठया टाक्यातून (सिलेंडर) काढून छोटया ४ किलो वजनाच्या लोखंडी टाक्यात (सिलेंडरमध्ये) रिलीफ पिन चे साहयाने व पाईपचे सहाय्याने गॅस ट्रान्सफर करुन लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल हे माहीत असून सुध्दा मानवी जिवीतास हानी पोहचविणा-या कोणत्याही संभाव्य धोक्यपासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करणे गरजेचे असताना ज्वालाग्राही पदार्थ बाबत पुरेसा बंदोबस्त करणेस जाणीवपूर्वक टाळून त्या गॅसच्या टाक्या चढे दरात स्वतःचे आर्थिक फायदयाकरता विक्री करून लोकांची व शासनाची फसवणुक करुन, विनापरवाना, अवैधरित्या गॅस टाक्या व गॅस ट्रान्स्फर करण्यास लागणारे साहीत्याचा असा एकूण ३६,४६०/- रु. किंमतीचा अवैध साठा जवळ बाळगला असून दुकानामध्ये देशी विदेशी दारूच्या व बियरच्या बाटल्यांचा असा एकूण २४,२५०/- रु कि. चा मुद्देमाल विक्री करण्याचे उद्देशाने जवळ बाळगल्या आहेत. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि/कांबळे ७२१९६०३२१५ |

**१०.**

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ५१८/२०२२ भादवि कलम ४२०,४०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | जानेवारी २०१९ ते अदयापपर्यत टी - १३३, एमआयडीसी भोसरी,पुणे या कंपनीमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि. २५/०८/२०२२ रोजी ००/१५ वा. |
| फिर्यादी | :- | राकेश सत्यनारायण मित्तल धंदा - व्यावसाय रा. बोटकल्ब रोड, मिरा सोसायटी, पहिला मजला बंडगार्डन |
| आरोपी | :- | १)प्रदीप गोवर्धनदास वोरा वय ६९ वर्षे रा.रुंगटा हाऊस,६८,नेपिअन सी रोड,मुंबई ४०००००६<br>२)वरुण प्रदीप वोरा,वय ३५ वर्षे रा.सदर **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी संगनमत करुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन त्यांना त्यांचे बोटक्लब रोडवरील ऑनकोर (encore) या बांधकाम साईटमध्ये ४ बीएचके फ्लॅट देण्याचे आमिष दाखवुन सदर साईटसाठी सन २०१७ मध्येच रेराची परवानगी घेतली असतांना सुध्दा फिर्यादी यांचे फ्लॅटची रितसर बुकींग न घेता अप्रामाणिकपणे फिर्यादी कडून बुकींगकरिता बिझनेस/सॉफ्ट लोनचे स्वरुपात रु.५० लाख रक्कम घेवुन फिर्यादी यांना फ्लॅट दिला नाही तसेच फिर्यादी यांची रक्कम परत न करता सदर रकमेचा परस्पर अपहार करुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | एस एस पांचाळ, सहा.पोलीस निरीक्षक ८९२८३७६१०० |